REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १८ आक्टोबर, १९५० | अंक ४२

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८१ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर व पौड

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दी बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापनाः १९३६.
मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,१६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहुपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.—

ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

**दळणाच्या चक्क्या-टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
**कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.**
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

## विविध माहिती

**बिस्किटें करण्याची यंत्रसामुग्री**—ता. ३१ ऑक्टोबर १९५१ पर्यंत बिस्किटाच्या कोणत्याही नव्या कारखान्याला लागणारी यंत्रसामुग्री आयात करण्याच्या मागणी अर्जांचा भारत सरकार विचार करणार नाहीं असें समजतें. भारतांतील बिस्किटाच्या धंद्याचा पुन्हां आढावा घेऊन गेल्या वर्षीं घेतलेल्या वरील निर्णयाची मुदत अशा तऱ्हेनें एक वर्ष वाढविण्यांत आली आहे.

**पाकिस्तानची विकास योजना**—पाकिस्ताननें आपल्या आर्थिक विकासासाठी सहा वर्षें मुदतीचा एक कार्यक्रम आंखला आहे. ह्या योजनेला सुमारें २६० कोटी रु. भांडवली खर्च लागेल असा अंदाज आहे. पाकिस्तानांतील शेती, वहातुक, टेलिकम्युनिकेशन्स, औद्योगिक जळण व शक्ति इत्यादि बाबींचा विचार करण्यांत येणार आहे. योजना पूर्ण झाल्यावर पाकिस्तानांत ६ तागाच्या गिरण्या, २४ कापडाच्या गिरण्या आणि १ कागदाची गिरणी असे कारखाने होतील.

**कोरिआंतील सैनिकांची करमणूक**—कोरियांतील अमेरिकन सैनिकांच्या मनोरंजनासाठी ३० सिनेमा नट-नटींचें एक पथक नुकतेंच रवाना झालें. ह्या पथकांत बॉब होप, जेन रसेल, जुडी केली, इत्यादि प्रसिद्ध कलावंत आहेत.

**वैद्यकीय मदतीचा नवीन कार्यक्रम**—इराकमधील एका वैद्यकीय संस्थेनें गरजूंना वैद्यकीय मदत देण्याची एक नवीन पद्धत अमलांत आणली आहे. बगदादमधील प्रत्येक कुटुंबाला एक कार्ड देण्यांत आलें आहे. कार्डावर कुटुंबांतील सर्व व्यक्तींच्या नांवाची नोंद असते. हें कार्ड दाखवितांच कुटुंबांतील कोणत्याही व्यक्तीला १ महिनाभर औषध मिळतें. ह्या कार्डासाठीं प्रत्येक कुटुंबाला महिना फक्त २ रु. द्यावे लागतील. कमी उत्पन्न असलेल्या लोकांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला थोडक्यांत मिळावा, असा ह्या पद्धतीचा हेतू आहे. बगदाद शहरांत ह्या नवीन पद्धतीचा फायदा घेणारीं ५०० कुटुंबें आहेत.

**स्टॅलिनच्या पुस्तकाचा प्रचंड खप**—मार्शल स्टॅलिन ह्यांनीं लिहिलेल्या 'शॉर्ट हिस्टरी ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी ऑफ दि सोव्हिएट युनिअन' ह्या पुस्तकाच्या गेल्या बारा वर्षांत ३,८०,००,००० प्रती खपल्या. ह्या पुस्तकाचें ६६ भाषांत भाषांतर झालें असून एकूण २४८ आवृत्त्या निघाल्या आहेत. इंग्लंडमध्ये ह्या पुस्तकाच्या १,४०,००० प्रती खपल्या आहेत.

**इराकला संयुक्त राष्ट्रसंघटनेची मदत**—संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या युनेस्को विभागाकडून इराकला ५२,००० डॉलर्सची मदत मिळाल्याचें समजतें. मागासलेल्या राष्ट्रांना तांत्रिक मदत देण्याच्या संघटनेच्या योजनेप्रमाणें ही मदत देण्यांत आली आहे.

**रशिआंत डार्विनचे ग्रंथ**—रशिआंतील शास्त्रज्ञांच्या मध्यवर्ती संघटनेनें चार्लस डार्विन ह्यांच्या वनस्पति शास्त्रावरील ग्रंथांचें मुद्रण करावयाचें ठरविलें आहे. डॉर्विन ह्यांचे सर्व ग्रंथ १२ खंडांत प्रकाशित होणार आहेत.

**पूर्व जर्मनी-चीन व्यापारी करार**—कम्युनिस्ट चीन आणि पूर्व जर्मनी ह्या दोन देशांत लवकरच एक व्यापारी करार करण्यांत येणार आहे, असें समजतें. जर्मनीकडून भांडवली स्वरूपाचा माल घेऊन चीन जर्मनीला कच्चा माल पुरविणार आहे.

**रेल्वेच्या डब्यांचा कारखाना**—कराचीला रेल्वेच्या डब्यांचा कारखाना काढण्याची एक योजना पाकिस्तानांतील एका उद्योगपतीनें सरकारला सादर केली आहे, असें समजतें. ह्या योजनेचा पाकिस्तान सरकार विचार करीत असून लवकरच कांहीं तरी निर्णय घेण्यांत येणार आहे.

**बिहारच्या मुलांसाठी दुधाची भुकटी**—संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या बालक सहाय्यक फंडातर्फे, बिहारमधील आपद्ग्रस्तांच्या मुलांना १ लाख पौंड दुधाची भुकटी फुकट पुरविण्यांत येणार असल्याचें कळतें.

**नागयोनीचा आसरा तुटला**—काश्मीरमधील नद्यांना बेसुमार पूर आल्यामुळें नागांना आपल्या वसतिस्थानांतून बाहेर पडावें लागलें. झेलम नदींत असे स्थानभ्रष्ट नाग वर फणा काढून वहात चाललेले दिसून येत होते.

**आपद्ग्रस्तांना मदत**—बिहार सरकारच्या सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे कोसी विभागांतील आपद्ग्रस्तांना १०,००० पौंड दुधाची भुकटी आणि जीवनसत्वें असलेल्या २ लाख वड्या वाटण्यांत आल्या.

**चीन परदेशी भांडवल घेणार !**—कम्युनिस्ट चीननें आपल्या देशांत गुंतूं पहाणाऱ्या परदेशीय भांडवलाच्या नियंत्रणासाठीं कांहीं नियम केले असल्याचें समजतें. अवजड यंत्रें तयार करण्याच्या कारखान्यांत परकीय भांडवल फक्त ४९ टक्के गुंतवूं दिलें जाईल आणि त्यावर ताबा चिनी सरकारचा राहील. चरितार्थाच्या वस्तू करणाऱ्या धंद्यांत परदेशी भांडवल गुंतविण्यावर निर्बंध घातले आहेत, आणि परदेशी भांडवलावरील नफा चीनच्या बाहेर पाठवितां येणार नाहीं. सार्वजनिक उपयुक्ततेचे सर्व कारखाने चीन ३ वर्षांत राष्ट्राच्या मालकीचे करणार आहे. नियमांचें स्वरूप वरील प्रकारचें आहे.

**बर्नार्ड शॉ ह्यांचें शिधापत्रक**—सुप्रसिद्ध नाटककार जार्ज बर्नार्ड शॉ हे नुकतेच आपल्या बागेंत घसरून पडले आणि त्यांच्या मांडीच्या हाडावर शस्त्रक्रिया करावी लागली. मि. शॉ ह्यांना इस्पितळांत दाखल करून घेण्यांत आलें त्यावेळीं त्यांच्या शिधापत्रकाची मागणी करण्यांत आली. परंतु त्यांना लागणारें लोणी घरांतूनच आणण्यांत येत असल्यानें शिधापत्रक बरोबर नेलेलें नव्हतें. इस्पितळांतील नर्सनें अर्थातच नियमाप्रमाणें पत्रकाचा आग्रह धरला. अखेर मि. शॉ ह्यांच्या घरची व्यवस्था पहाणाऱ्या बाईची गांठ घेतल्यावर हें वादळ शमलें.

**रुमेनिआचा २० वर्षांचा कार्यक्रम**—रुमेनिआच्या सरकारनें आपल्या आर्थिक विकासाचा २० वर्षें मुदतीचा जंगी कार्यक्रम आंखला आहे. कार्यक्रम सोव्हिएट रशिआच्या पद्धतीचा आहे. कार्यक्रमांत १,००,००० किलोवॅट वीज उत्पन्न करणारें एक केंद्र आणि पाटबंधारे बांधण्यांत येणार आहेत. कार्यक्रमांत यावयाच्या धरणामुळें बरीच जमीन पाण्याखालीं येणार असून उद्योगधंद्यांना विजेची शक्ति मिळणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १८ आक्टोबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताची नैसर्गिक संपत्ति अत्यंत अपुरी आहे ?

भारताची दुःस्थिति वर्णन करतांना, नेहमी त्याच्या अमाप नैसर्गिक संपत्तीचा उल्लेख करण्यांत येतो. ह्या नैसर्गिक संपत्तीचें खऱ्या, उपभोग्य संपत्तींत रूपांतर करण्याचाच काय तो प्रश्न आहे आणि तो सोडविला की ह्या देशाचें दारिद्र्य नष्ट होऊन सर्वजण सुखी होतील, असें सांगण्यांत येतें. भारताची नैसर्गिक संपत्ति मोठी आहे, हें खरें आहे आणि तिचा उपयोग अद्याप पुरेशा प्रमाणावर करण्यांत आलेला नाहीं हेंहि सत्य आहे. ह्यामुळें, आपली आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या नैसर्गिक अनुकूलतेचा उपयोग करून घेण्यास बराच वाव आहे. परंतु, खरा प्रश्न नैसर्गिक संपत्ति केवढी मोठी असण्याचा नसून, दर माणशीं त्या संपत्तीचें प्रमाण काय पडतें, हा आहे. एकाधाच्या कुटुंबांत दोनच माणसें असलीं आणि त्याला दरमहा फक्त २०० रु. प्राप्ति असली, तरी दरमहा १,००० रुपये प्राप्तीवाल्या पंचवीस माणसांच्या कुटुंबापेक्षां हें पहिलें कुटुंब अधिक सुस्थितींत असेल, हें उघड आहे. संपत्ति आणि लोकसंख्या ह्या दोहोंचाहि एकदमच विचार केला पाहिजे, आणि भारतांतील नैसर्गिक संपत्तीचा तसा विचार केला, तर ही संपत्ति फारच अपुरी असल्याचें आढळून येतें. तेव्हां, त्या संपत्तीचें खऱ्या खुऱ्या, उपभोग्य संपत्तींत रूपांतर केलें, तरी ती संपत्ति इतर देशांशीं तुलना करता, कमीच पडणार हें उघड आहे.

औद्योगिक व शेती विषयक दोन्हींची ज्यांची नैसर्गिक संपत्ति फार मोठी आहे, असे देश म्हणजे कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि रशिया हे होत. त्याच्या उलट, केवळ औद्योगिक किंवा शेती विषयक संपत्ति असणारे इंग्लंड किंवा द. अमेरिकेसारखे प्रदेश आहेत. पूर्व युरोप, भारत, चीन, जपान, इत्यादि देशांतील नैसर्गिक संपत्ति त्यांच्या लोकसंख्येच्या मानानें अपुरी आहे. मनुष्यबळ जेवढें ज्यास्त, तेवढी प्रत्येकाच्या वाट्याची संपत्ति कमी, अशी तेथें स्थिति आहे. भारत हा दरिद्री लोकांचा संपन्न देश आहे, असें म्हटलें जातें, परंतु त्या नैसर्गिक संपत्तीची लोकसंख्येंत वाटणी केली, तर त्याचें दारिद्र्य सहज लक्षांत येण्याजोगें आहे. पुढील तक्ता हें स्पष्ट करील:—

### नैसर्गिक संपत्तीचें दरमाणशीं प्रमाण*

( १९३९ च्या पूर्वीच्या कांहीं वर्षांच्या आकड्यांवरून अंदाज )

| देश | कोळसा व तत्सम माळाचा संचय (दर माणशी टन) | जलनिर्मित शक्ती (दर माणशी अश्व शक्ती) | लोखंड (दर माणशी टन) | लागवडीजोगी जमीन (दर माणशी एकर) | चारा देणारी जमीन (दर माणशी एकर) |
|---|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ३,७०० | ०.०१५ | ३८.१ | ०.२८ | ०.४० |
| प. युरोपांतील देश | १,५१० | ०.२० | ३१.४ | १.०९ | ०.४७ |
| पूर्व ,, ,, | ९८० | ०.१० | ४.१ | १.३४ | ०.५१ |
| रशिया | ६,३०० | ०.४६ | ९४.० | २.३५ | ५.७० |
| अमेरिका व क्यूबा | १७,००० | ०.२५ | ४८.० | २.६६ | ४.४० |
| कॅनडा व न्यूफौंडलंड | ३७,३०० | २.२७ | २१७.१ | ५.०४ | ६.७८ |
| द. आफ्रिका | २०,६०० | ०.२३ | ३००.० | १.३१ | १०.०० |
| ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड | ३,५८० | ०.६४ | २०.७ | ३.७४ | १७.०० |
| अर्जेंटिना, युराग्वे, चिली | १०७ | ०.४८ | १२.७ | ४.६४ | १८.७० |
| भारत | ६६ | ०.१० | ५.९ | १.२९ | ०.५२ |
| चीन | ५४६ | ०.०५ | १.४ | ०.५५ | १.७८ |
| जपान | २२७ | ०.१० | ०.४ | ०.२३ | ०.११ |
| वरील यादींतील सर्व देश | ३,००० | ०.१६ | २४.६ | १.३० | २.१० |

*ए. जे. ब्राउन कृत 'इंडस्ट्रिअलायझेशन अँड ट्रेड' ( रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिन, सप्टेंबर, १९५० च्या अंकांत बी. के. मादन ह्यांच्या लेखांतील. )

### कोल्हापूर बँकेंतील "औद्योगिक तंटा"

बँक ऑफ कोल्हापूर लि., आणि त्याच्या मुख्य कचेरींतील नोकर ह्यांचेमधील तंटा निवाड्यासाठी मुंबई सरकारनें इंडस्ट्रियल कोर्टाकडे सोपविला आहे. बँक नोकरवर्गाच्या चहाच्या क्लबाला आणि करमणुकीच्या क्लबाला दरमहा, अनुक्रमें २५ रु. व २० रु. ग्रँट देत असे ती बंद करण्याचा बँकेचा विचार आहे, आणि नोकर वर्गानें त्यास विरोध केला आहे म्हणून ही मध्यस्ती आली आहे.

**सहकारी संस्थेला कर्ज**—हिम्मजवाडी सहकारी लिफ्ट इरिगेशन ह्या संस्थेला यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी मुंबई सरकारनें ८७,३२५ रु. कर्ज देऊं केलें आहे. तितकीच रकम आर्थिक मदत म्हणून देण्यांत येणार आहे. सरकारी साह्याचा उपयोग करून ही संस्था एक वर्षाच्या आंत १,००० एकर जमिनीस पाणी पुरवठा करणार आहे. व्याजाचा दर ३॥ टक्के असून परतफेड १५ वार्षिक हप्त्यांनीं करावयाची आहे.

**सरकारी नोकरांच्या पगारांतील तफावत**—पूर्व पंजाबमधील सरकारी नोकरांना मिळणारा जास्तींत जास्त पगार ४,००० रु. आहे आणि कमींत कमी पगार १५ रु. आहे, असा खुलासा पंजाब विधिमंडळांत करण्यांत आला.

### आमचा दिवाळी अंक

"अर्था"चा दि. ८ नोव्हेंबर, १९५० चा अंक "दिवाळी अंक" असून त्यांत दरवर्षीप्रमाणें महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांवर अनेक अनुभवी तज्ज्ञांचे लेख प्रसिद्ध होतील.

**दि. १ नोव्हेंबरचा अंक निघणार नाहीं.**

## महायुद्धापासून ब्रिटनचें औद्योगिक उत्पादन

( मा. म. काळे. ) ( ब्रि. इ. स. च्या आधारें )

जगावर आज कम्युनिझमचें संकट ओढवलेलें आहे, व या संकटापासून जगाची शक्य-तितकी मुक्तता करण्याचे प्रयत्न अमेरिका व ब्रिटन या राष्ट्रांचे चालले आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत हवाई हल्ले व कारखाने, गोद्या इत्यादींचा विध्वंस झाल्यामुळें ब्रिटनचें एकंदर नुकसान १५० कोटी पौंडांचें झालें असावें असा अंदाज आहे. या दृष्टीनें पश्चिम युरोपांतील देशांचें औद्योगीकरण करणें आवश्यक आहे. हें औद्योगीकरण साधावयाचें म्हणजे पश्चिम युरोपच्या दृष्टीनें ब्रिटननें आपल्या स्वतःच्या संरक्षणाचे विशेष प्रयत्न केले पाहिजेत. अटलांटिक करार व मार्शल योजना या गोष्टींचा परिणामीं उद्देश औद्योगिक व संरक्षक तटबंदी निर्माण करावी हा असला पाहिजे.

या दृष्टीनें ब्रिटननें आतांपर्यंत औद्योगिक क्षेत्रांत केलेले प्रयत्न डोळयांत भरण्यासारखे आहेत. १९४६ चा ब्रिटनच्या औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १०० मानला तर १९५० च्या मध्याचा हाच आंकडा १४३ आहे. पोलादाच्या उत्पादनाच्या बाबतींत मात्र विशेष प्रगति झाली आहे. १९३८ साली पोलादाच्या निरनिराळ्या प्रकारांचे, दर आठवड्याला २ लक्ष टन उत्पादन होई तें १९४६ सालीं आठवड्याला २ लक्ष ४४ हजार टन झालें व १९५० च्या पहिल्या सहामाहींत आठवड्याला ३ लक्ष २० हजार टन इतकें वाढलें. संरक्षणाच्या दृष्टीनें पोलादाच्या उत्पादनाची प्रगति विशेष मनांत भरण्यासारखी आहे. त्याचप्रमाणें संरक्षणाच्या दृष्टीनें मोटारींच्या उत्पादनाची प्रगति चालू वर्षी १९४६ च्या मानानें अडीच पट होत आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. इंजिनियरिंग, वीज व जहाजें बांधणें या धंद्यांतील उत्पादन १९४६ च्या मानानें शेंकडा ५० या प्रमाणांत वाढलें आहे, व रासायनिक धंद्यांचें उत्पादन शेंकडा ३६ या प्रमाणांत वाढलें आहे. टँकर्स पद्धतीचीं जहाजें सुद्धां १९४६ च्या तीन पट बांधलीं जात आहेत. गेल्या पांच वर्षांत उपभोग्य मालाच्या उत्पादनाच्या ऐवजीं भांडवली स्वरूपाच्या व बांधकाम, संरक्षण दृष्टींनीं उपयुक्त पडणाऱ्या मालाचें उत्पादन वाढविण्यासाठी भांडवलदारांनीं या संरक्षणाच्या दृष्टीनें उपयुक्त अशा धंद्यांकडे आपल्या भांडवलाचा ओघ वळविल्यामुळें हें वाढतें उपयुक्त उत्पादन आज १९५० सालीं शक्य होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर निरनिराळ्या ७,००० कारखान्यांच्या इमारतींसाठी एकंदर ३९ कोटी पौंडांचा भांडवली खर्च मंजूर करण्यांत आला. या व्यतिरिक्त बराच खर्च नवीन यंत्रसामुग्रीसाठी करण्यांत आला. चालू सालीं पोलादाचें उत्पादन वाढविण्यासाठी कारखान्याच्या यंत्रसामुग्रीसाठी ४२ कोटी पौंड खर्चीं पडावयाचे आहेत. खाणींच्या यंत्रीकरणासाठी व विद्युत्शक्ति वाढविण्यासाठी ३३ कोटी पौंड खर्ची पडणार आहेत. विजेचें उत्पादन १९४६ च्या मानानें दरमहा एक सहस्र दशलक्ष किलोवॅट्स जास्त होत असलें तरी तें आजच्या गरजांच्या दृष्टीनें सर्व अपुरेंच पडत आहे. जनतेच्या आत्मयज्ञानें हें सर्व शक्य झालें आहे.

---

**पाटण्यांतील खोटीं रेशन कार्डें**—पाटणा शहरांत सुमारें २ लाख रेशन कार्डें असावींत असा तेथील शिधा-खात्याचा अंदाज आहे. पाटणा शहराला दरमहा ३२,००० मण अन्नधान्याचा शिधा लागतो. खोट्या रेशनकार्डांमुळें १०,००० मण अन्नधान्य निष्कारण द्यावें लागतें असें समजतें.

## जमिनीची धूप थांबविण्याचें महत्त्व

मानवाच्या विघातक बुद्धिमत्तेचीं ठळक उदाहरणें म्हणून हिरोशिमो आणि नागासाकी हीं नांवें आजकालच्या वाङ्मयांत रूढ झालीं आहेत. परंतु जमिनीच्या धुपीच्या रूपानें जणुं मृत्यूच्या चोरट्या चालीनेंच काय भयंकर अनर्थ वाटचाल करीत आहे व निसर्ग किती भक्ष्य गिळीत आहे याची कल्पना फारच थोड्या लोकांना असेल.

दरवर्षी गंगा नदी आपल्या प्रवाहाबरोबर ३५,९०,००,००० टन चांगली सुपीक म्हणजे सुमारें एक फूट खोल आणि ९०० चौ. मैलांची जमीन वाहून नेते आणि ती बंगालच्या उपसागरांत टाकते असा अंदाज सुप्रसिद्ध भूगर्भशास्त्रज्ञ श्री. अर्चिबाल्ड गायकी यांनीं व्यक्त केला आहे. ती माती आपण परत आणूं शकत नाहीं. केवळ एका पुरामुळें गमाविलेल्या भूपृष्ठावरील एक इंच मातीचा थर परत मिळविण्यास निसर्गाला ३०० ते १००० वर्षें लागतात. जमिनीच्या धुपीचें हें विध्वंसक कार्य सुमारें १५,००,००,००० एकर जमिनींत चालू आहे, असें पंजाब राज्याचे जंगलखात्याचे प्रमुख सर हॅरोल्ड ग्लोव्हर यांनीं लिहिलें आहे. जंगलामुळें नासाडी होणाऱ्या जमिनीचा वरील आंकड्यांत समावेश केला नाहीं. एके काळीं विस्तीर्ण भूप्रदेशावर प्रचंड जंगलांचें आवरण असे आणि त्यायोगानें पावसाचें पाणी झिरपत झिरपत जमिनीस मिळे. कालांतरानें जंगलें तोडलीं गेल्यानें आतां पावसाचें पाणी थेट नद्यांना मिळतें आणि प्रचंड पूर येतात. एवढ्यानेंच सगळें संपत नाहीं. ही धळलेली माती पाणीपुरवठ्याच्या मोठमोठ्या तलावांत वहात जाऊन तेथें बसते व ते निरुपयोगी होतात असें परदेशांत झालेल्या प्रयोगांवरून दिसून येतें.

उंचल्या प्रदेशावर पावसाचा मारा झाल्यानंतर तें वाहून जाणारें पाणी पिकांच्या जमिनीचें नुकसान करतें आणि या कारणानें आपल्या चांगल्या जमिनीपैकी बराचसा हिस्सा नद्यांच्या पात्रांत विलीन होतो आणि अशा जमिनी उत्पादनाच्या दृष्टीनें निकामी ठरतात. शेत जमिनींपैकीं एक तृतीयांशाहून अधिक जमिनीची अशा प्रकारें झीज होत असते असा अंदाज असून आतांपर्यंत लक्षावधी एकर जमिनीस आपण मुकलों आहोंत. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशांत २५,००० चौ. मैलांहून अधिक भूप्रदेशाकडे तातडीनें लक्ष देणें अत्यावश्यक झालें आहे. हा विस्तीर्ण भूप्रदेश राज्यांतील एकूण क्षेत्रफळाचा चवथा हिस्सा असून त्याची विविध कारणांनीं हानी झालेली आहे आणि त्यास सुस्थिति आणणें जरूरीचें आहे. अशा प्रदेशांची सुधारणा करण्यासाठीं काळजीपूर्वक नियोजन करावयास हवें.

लागवडीचीं कामें, काढलेल्या पिकांचे जमिनींत बंधे ठेवणें, वाफ्यांतून पिकें काढणें, उतरणीवर बांध घालणें, पाणीपुरवठा, पाण्याचा निचरा करणें, सुधारलेलें बियाणें, खतें, अद्यावत् यंत्रसामुग्री, रोगनिवारण इ. प्रश्नांकडे अधिक धान्यउत्पादन वाढविण्यासाठीं योग्य लक्ष दिलें पाहिजे. यांपैकीं बहुतेक गोष्टी शेतकऱ्यांना परिचित असून त्यांना त्या सहज अमलांत आणतां येतील. उत्साहाची आणि जमिनी सुधारण्यास मदत देण्याचीच काय ती जरूरी आहे आणि हें घडलें तर आपल्या जीवननिर्वाहापैकीं अति महत्त्वाचें साधन असलेल्या जमिनीचें संरक्षण होईल आणि त्यामुळेंच आपला व आपल्या मुलांबाळांचाहि मरणाचा धोका टळेल.

## सर्वसामान्य जनतेच्या नीतिमत्तेचा ऱ्हास हेंच काळ्याबाराचें कारण !

### काळाबाजार व्यापारी थांबवूं शकतील काय ?

(लेः– श्री. ना. अ. तेंडोलकर, मॅ. डायरेक्टर, दि हिंद एजन्सी लि.)

( पूर्वार्ध )

आज सर्वसामान्य जनतेच्या नीतिमत्तेची पातळी इतकी खालच्या थरास गेली आहे कीं, शेंकडा दोन टक्के असणाऱ्या व्यापाऱ्यांनीं शंभर टक्के शुद्ध वागल्यासहि काळ्या बाजारावर एक टक्काहि परिणाम होणार नाहीं. कारण, उरलेल्या ९८ टक्के जनतेस काळ्या बाजाराची इतकी चटक लागली आहे कीं, काळ्या बाजाराचा उगम कोठून होतो व शेवट कोठें होतो हें परमेश्वर सुद्धां सांगूं शकणार नाहीं, मग पुराव्यानें सिद्ध करणें बाजूसच राहो ! आज सर्वच जनता काळाबाजार करित आहे.

नुकतीच नाशिक येथें घडलेली गोष्ट. कै. साने गुरुजींबद्दल फारच आदर व्यक्त करण्यांत येतो. त्यांच्या १२ व्या दिवशीं त्यांच्या एका चहात्या पुस्तक विक्रेत्यानें त्यांनीं लिहिलेलीं सर्व पुस्तकें चौकांत विक्रीस मांडलीं व तेथें एक कुलूप लावून पैशाची पेटी ठेविली; किंमत पेटींत टाकून पाहिजे तें पुस्तक न्यावें, अशी पाटी लाविली. सायंकाळपर्यंत सहाशें रुपयांचीं पुस्तकें नेलीं गेलीं होतीं तर पेटींत फक्त १२५ ते १५० रु. चा गल्ला जमला होता. आज सर्वत्र असेच लूटमारीचे प्रकार आपापल्या ताकतीनुसार करण्यांत प्रत्येकजण मग्न आहे. काळाबाजार थांबणार तरी कसा ? आणि त्यांत व्यापाऱ्यांचा हिस्सा किती ?

सरकारी नोकरींत कमालीची लांचलुचपत बोकाळली असून सर्वत्र कामांत सावळागोंधळ माजला आहे. जनतेनें निवडून दिलेले प्रतिनिधी मोटारी नसतांना पेट्रोल कुपन्स घेऊन तीं काळ्याबाजारांत विकत आहेत. दारूबंदी प्रचार समितीचे सभासद दारू पिऊन बेहोष पडल्यामुळें त्यांचेवर खटले भरले जात आहेत. समाजांत प्रतिष्ठितपणें वागणारे गुन्हेगार सहीसलामत सुटतात. रेल्वेंतून पार्सल यावयाचे म्हणजे तें फुटून व निम्मा माल चोरीस गेलेला. स्टेशन मास्तराची तजवीज केल्याखेरीज साधें पार्सलहि रवाना होऊं शकत नाहीं. तर आमचा शेतकरीवर्ग खोट्या पिकाचे आंकडे कसे द्यावेत, लेव्ही कशी चुकवावी, गरज नसतांहि सरकारी धान्य नियंत्रित दरांत कसें मिळवावें, तगाई कर्जे घेऊन चैन कशी करावी यांत निमग्न. आमच्या कामकरी वर्गबंधुबद्दल बोलावयाचें म्हणजे, कमींत कमी काम, जास्तींत जास्त दाम, व न मिळवलेल्या नफ्यांत हिस्सा व कारखान्यांची भागी मागतात, तर आमचे पुढारी बंधु अन्न जनतेस पाहिजे तीं वचनें देऊन देशहितापेक्षां वैयक्तिक मोठेपणा व स्वतःचा जम बसविण्याचा अट्टाहास करतांना आढळतात.

अशा या बजबजपुरींत एकट्या व्यापाऱ्यावर ( व क्वचित् प्रसंगीं कारखानदारावर ) या सर्वांचें खापर फोडलें जातें. व्यापारी म्हणजे नफेखोर, साठेबाज, काळाबाजारवाला, देशद्रोहि, जहरी नाग, वगैरे शेलक्या विशेषणास पात्र ठरविला जातो. देवास बोकड बळी देण्याच्या वहिवाटीस अनुसरून स्वभावानें शांत व सोशिक, " आपले काम भले व आपण भला " असें मानणारी, स्वतःच्याच कार्यांत नेहमीं मग्न असल्यानें आजूबाजूस काय चाललें आहे याची कल्पना नसणारा संघटनाविरहीत पण सर्व सामाजिक, राजकीय कार्यांस सढळ हातानें मदत करणारा असा वर्ग म्हणजे व्यापाऱ्यांचाच होय ! ह्या वर्गानेंच आजपर्यंत व आतांपर्यंत देखील राष्ट्रकार्यासाठीं केवढी तरी झीज सोसली असतां व त्याग केला असतां समाजांतील सर्व दोषांचें खापर एकट्या व्यापाऱ्यांचे डोक्यावर फोडलें जात आहे.

आजपर्यंत ज्या ज्या वेळीं बाजारांत मालाचा तुटवडा पडून किंमती वाढल्या आहेत, त्या त्या वेळीं राजकीय पुढारी व वृत्तपत्रें यांनीं व्यापारीवर्गाविरुद्ध कांगावा केला आहे. स्वस्त लोकप्रियता मिळविण्याचा हा सर्वांत सोपा मार्ग आहे. कारण जनतेचें लक्ष कोणत्या तरी एका गोष्टीकडे वळविल्या खेरीज व बाराहि महिने कांहींची उचापती केल्याखेरीज पुढाऱ्याचें श्रेष्ठत्व व पुढारीपण टिकूं शकत नाहीं. तसेंच वृत्तपत्रांचा धंदा जनताशिक्षणापेक्षां जनता-रंजन हा वाढत्या प्रमाणावर होऊं लागल्यानें लोकांस जे आवडेल तें लिहिणें, या न्यायानें व्यापारी–कारखानदाराविरुद्ध वेळोवेळी टीका करणें व इतर बहुसंख्य वर्गाची तथाकथित बाजू मोठ्या जोरदारपणें पुढें मांडणें हा त्यांचा धंदा आहे. कारण, ९८ टक्के वाचक बिगर व्यापारी आहेत, व आपल्या बहुसंख्य वाचकांना आवडेल तें लिहिणें हा वृत्तपत्रांचा धंदा किंवा व्यापार आहे.

हिटलरनें आपल्या आत्मचरित्रांत एक मोठा मानस-शास्त्र सिद्धांत मांडला आहे. तो म्हणजे, " एकाद्या खोट्या गोष्टीचा वारंवार उच्चार करा, म्हणजे कांहीं दिवसानंतर जनता तेंच खरें मानूं लागेल ! " या तत्त्वाप्रमाणें व्यापारीवर्गाविरुद्ध हा प्रचार संघराजाचे अध्यक्ष व मुख्य मंत्र्यापासून ते थेट हमाल–मजूर करूं लागल्यानें आज सर्वत्र " व्यापारी म्हणजेच काळा बाजारवाला किंवा व्यापाऱ्यामुळेंच काळाबाजार होतो " असा समज पसरला असून, या वर्गाविरुद्ध सर्वत्र निर्माण झालेली चीड हा याचा परिणाम आहे.

शेतकरी–कामकरी किंवा सर्वसामान्य राहणीच्या दृष्टीकोनांतून या प्रश्नाकडे पाहातां, आजपर्यंत निरनिराळ्या संस्थांमार्फत किंवा विश्वविद्यालयांतर्फे सर्वसामान्य राहणीच्या खर्चाची पत्रकें ( फॅमिली बजेटस ) प्रसिद्ध झालीं आहेत, त्याप्रमाणें पाहतां सर्व सामान्य माणूस आपल्या मिळकतीपैकीं,

(१) ३० ते ४० टक्के अन्नावर खर्च करतो.
(२) १५ ते २० टक्के घरभाडें, इत्यादींवर खर्च करतो.
( ३ ) १० टक्के कापडलत्ता–सणवार वगैरेसाठीं.
( ४ ) १० टक्के उत्सव व करमणूक.
( ५ ) १५ ते २० टक्के प्रवास, शिक्षण, औषधोपचार वगैरे.

या " फॅमिली बजेटास " अनुसरून विचार करतां:—

( १ ) सर्व प्रकारचीं अन्नधान्यें सरकारी नियंत्रणाखालीं आहेत.
( २ ) कापड सरकारी नियंत्रणाखालीं आहे.
( ३ ) सर्व घरांची मालकी व्यापारीवर्गाकडेच असून त्यांनीं भाडीं भरमसाठ वाढविलीं आहेत, असें मानण्यास जागा नाहीं. पण हें मात्र सत्य आहे कीं, मुंबई–पुण्याखेरीज इतरत्र भाड्याचे दर गेल्या ७–८ वर्षांत पांच पटीनें वाढले आहेत. प्रवास, करमणूक, औषधोपचार वगैरे बाबींशीं व्यापाऱ्याचा फारच थोडा संबंध येतो. मुख्य राहिल्या बाबी म्हणजे, किराणा, भुसार व स्टेशनरी वगैरे होत. परंतु सर्वसामान्य मनुष्य मिळकतीपैकीं १० टक्केच यावर खर्च करीत असल्यानें या जिनसांचा काळा बाजार होतो असें मानलें तरीहि त्याचा राष्ट्रीय जीवनावर कांहींहि परिणाम व्हावयास नको होता. तर आज काळाबाजार कां जाणवतो ? यासंबंधी थोडें खोलांत शिरून विचार करतां देशांतील ६८ टक्के वर्ग शेतकरी, १० टक्के कामकरी व राहिला मध्यमवर्ग, व्यापारी, कारखानदार वगैरेच आढळतो.

( अपूर्ण )

## शेअर्स घेण्याचा करार रद्द केव्हां होईल ?

### भागीदारावरील जबाबदारीचें स्वरूप

शिरोमणी शुगर मिल्स लि. खलिलाबाद ( गोरखपूर ) ही पब्लिक लिमिटेड कंपनी ७ नोव्हेंबर, १९३३ रोजीं स्थापन झाली. तिचा प्रमुख उद्देश, भारतांत किंवा इतर ठिकाणीं अपटुडेट व नव्या शास्त्रीय पद्धतीनें व मशिनरीनें सर्व तऱ्हेची साखर करणें आणि त्यासाठी कारखाने उभारणें असा होता. १६ ऑक्टोबर, १९३३ रोजीं तिचा प्रॉस्पेक्टस प्रसिद्ध झाला. तो रजिस्ट्रारकडे २६ फेब्रुवारी, १९३४ रोजीं नोंदण्यांत आला. कंपनीनें प्रेफरन्स व ऑर्डनरी भाग काढले होते. त्यांपैकीं प्रेफरन्स भागाची किंमत १०० रु. होती. त्यांतील २० रु. अर्जासोबत, ३० रु. अलॉटमेंट नंतर आणि बाकीचे ५० रु. डायरेक्टर मागतील त्याप्रमाणें कॉलसनीं भरावयाचे होते. ठरलेल्या मुदतींत भागीदारानें ह्यापैकीं कोणतेहि पैसे भरले नाहींत, तर शेअर रद्द व्हावा अशी तरतूद ३२ व्या कलमांत होती. कंपनीच्या ऑफिशिअल लिक्विडेटरनें लावलेल्या दाव्यांतील सर्व प्रतिवादी हे कंपनीचे भागीदार होते. कांहींनी अलॉटमेंटचेहि पैसे दिले नव्हते, तर कांहींनी पहिल्या व दुसऱ्या कॉलचे पैसे दिले नव्हते. यामुळें डायरेक्टरांच्या १९३९ मधील सभेंतील ठरावानुसार त्यांचे शेअर्स रद्द (फॉरफिट) करण्यांत आले. ७ डिसेंबर, १९४१ रोजीं कंपनी गुंडाळण्याचा हुकूम झाला आणि ऑफिशिअल लिक्विडेटरनें हे पैसे वसूल करण्यासाठी दावे लावले. प्रतिवादींचें म्हणणें असें:–(१) मुद्दाम गैरसमज करणारीं विधानें करून, उत्पादकांनीं शेअर्स विकले. (२) खरेदीच्या वेळीं ज्या गोष्टी करण्याचें आश्वासन देण्यांत आलें होतें त्या गोष्टी कंपनीनें केल्या नाहींत, म्हणून पुढील रकमा न देण्यांत प्रतिवादींची कांहींहि चूक नाहीं. (३) डायरेक्टरांनीं ज्या ठरावान्वये शेअर्स ॲलॉट केले, ते ठराव बेकायदा होते, कारण ठरावावर मत देण्याचे वेळीं त्यांचें डायरेक्टरपद रद्द झालेलें होतें. (४) त्याच कारणासाठीं, शेअर फॉरफीट करण्याचे ठरावहि बेकायदा होतात. ज्या स्मॉल कॉज कोर्ट जज्जापुढें हे दावे चालले, त्यानें प्रतिवादींचें हें सर्व म्हणणें मान्य करून लिक्विडेटरचे दावे काढून टाकले. त्यावरील अलाहाबाद हायकोर्टाकडील रिव्हिजनच्या अर्जाचा निवाडा आतां प्रसिद्ध झाला आहे.

### निवाड्यांतील कायद्याचें विवेचन

अर्ज आणि अलॉटमेंट' ह्या स्वरूपांत शेअर खरेदीचा करार व्हावयाचा असेल, तर शेअर घेणाऱ्याचा अर्ज असला पाहिजे. अर्जाप्रमाणें कंपनीच्या डायरेक्टरांनीं ॲलॉटमेंट केलेली पाहिजे आणि अशी अलॉटमेंट झाल्याचें डायरेक्टरांनीं भागीदारांस कळविलें असलें पाहिजे. भागीदार होण्याचें मान्य करणाऱ्या शेअर होल्डरनें आर्टिकल्स ऑफ असोसिएशनप्रमाणें त्याची किंमत दिलीच पाहिजे. अर्थात्, शेअर खरेदीचा करार त्याला करावयास लावताना विरुद्ध पक्षाचें वर्तन फसवणुकीचें असतां कामा नये. ही फसवणूक लक्षात आल्यावर योग्य वेळांत हा करार रद्द करता येतो. प्रॉस्पेक्टसमध्यें एकाद्या महत्त्वाच्या बाबींत दिशाभूल करण्यांत आलेली असेल, तर शेअर खरेदीचा करार रद्द करवून भागीदाराचे नांव भागीदारांच्या याद्यींतून काढून टाकविण्याचा कोर्टास अधिकार आहे.

प्रस्तुत दाव्यांत, स्मॉलकॉज जज्जानें प्रॉस्पेक्टसमधील एकाच चुकीच्या विधानावर अवलंबून राहून निवाडा केला. " मॅनेजिंग एजंटस्, त्यांचे मित्र, उत्पादक व डायरेक्टर्स ह्यांनीं अगोदरच ६,००,००० रु. चे शेअर्स घेण्याचें कबूल केलें आहे," हें तें विधान होय. हें वाक्य प्रॉस्पेक्टसच्या मुखपृष्ठावर तांबड्या शाईनें छापलेलें होतें. अशी कबुली दिलेलीच नव्हती, असें जज्जाला आढळून आलेलें नाहीं. कबुली नव्हती, असें सिद्ध झालें नाहीं तर तें दिशाभूल करणारें विधान होणार नाहीं. ही कबुली प्रत्यक्षांत उतरली असती तर त्यांनीं ६,००,००० रु. चे शेअर्स घेतले आहेत, असेंच प्रॉस्पेक्टसमध्यें छापलें असतें. प्रॉस्पेक्टसमधील विधानाचा अर्थ, ६००,००० रु. चे शेअर्स घेतलेले आहेत किंवा त्यासाठी अर्ज केलेला आहे, असा कोणी केला तर त्याबद्दल कंपनीच्या उत्पादकांना जबाबदार धरतां येणार नाहीं. मॅनेजिंग एजंटस् वगैरेनीं कबुली दिलीच नव्हती हें सिद्ध झालें नाहीं तरी, कबुलीप्रमाणें न वागल्यानें कबुली खोटी ठरत नाहीं. मॅनेजिंग एजंटांनीं आपलें वचन पाळलें नसेल; परंतु त्यांच्या वचनामुळें दिशाभूल झाली असें म्हणतां येणार नाहीं. मॅनेजिंग एजंटांचें वचन दिशाभूल करणारें होतें असें मानलें तरी सुद्धां त्यामुळेंच प्रतिवादी शेअर्स घेण्यास प्रवृत्त झाले असें मानण्यास पुरावा नाहीं. डायरेक्टरांनीं स्वतःच्या लायकीस आवश्यक ते शेअर्स घेतले नसले, तरी त्यांना त्यासाठीं दोन महिन्यांची मुदत होती. दोन महिन्यांत त्यांनीं ते घेतले नाहींत, तरी १५७ व्या कलमानें त्यांचेवर ते घेणें बंधनकारक होतेंच.

कंपनी लवकरच साखर करण्यास प्रारंभ करील, असें भागीदारांना सांगण्यांत आलें होतें. परंतु वस्तुस्थितीची ही दिशाभूल नव्हे. प्रॉस्पेक्टसमध्यें थोडेंसें वाढवून सांगितलें तर तें क्षम्य असतें. शेअर घेण्याच्या कराराचा तो महत्त्वाचा भाग होता, असें मानण्यास पुरावा नाहीं. स्मॉल कॉज जज्जानें, प्रॉस्पेक्टसमध्यें कांहीं गोष्टी उघड केल्या नव्हत्या, त्या विचारांत घेतल्या आहेत. कंपनी कायद्याच्या ९३ व्या कलमाप्रमाणें, डायरेक्टरांच्या लायकीसाठी किती शेअर्स आवश्यक आहेत, कंपनी खरीदणार असणाऱ्या मालमत्तेच्या विक्रीदारांची नांवें व पत्ते आणि प्रत्येक महत्त्वाच्या कराराच्या तारखा व त्या करारदारांचीं नांवें, हीं प्रॉस्पेक्टसमध्यें दिलीं पाहिजेत. शिरोमणी कंपनीच्या प्रॉस्पेक्टसमध्यें हा तपशील नव्हता. परंतु, त्याला कायद्यानें शिक्षा सांगितलेली नाहीं. एकादी गोष्ट लपवून ठेवल्यानें महत्त्वाच्या बाबतींत दिशाभूल झाली, तर करार रद्द होऊं शकतो. परंतु, एकादी गोष्ट नमूद नाहीं म्हणूनच केवळ करार रद्द करून मिळण्याचा भागीदारास अधिकार प्राप्त होत नाहीं. प्रस्तुत प्रकरणांत, नमूद न केलेल्या बाबीमुळें नमूद केलेल्या बाबी खोट्या ठरत नाहींत.

मॅनेजिंग डायरेक्टर्स किंवा इतर डायरेक्टर्स ह्यांनीं कांहीं नियम मोडले, म्हणून शेअर्स घेण्याचा करार शेअर होल्डर्स रद्द करूं शकत नाहींत. त्यांचें वर्तन निष्काळजीपणाचें किंवा गफलतीचें असेल आणि रजिस्ट्रारकडे खोटे कागद नोंदवले असले तरी तेवढें कारण शेअरहोल्डरांना करार रद्द करण्यास पुरेसें होत नाहीं. अशा परिस्थितींत ॲलॉटमेंटचे व कॉलचे पैसे शेअर होल्डरांनीं न भरणें वाजवी नव्हतें, हें स्मॉ. कॉ. जज्जांचें म्हणणें चुकीचें आहे. जोपर्यंत शेअर खरेदीचा करार रद्द झालेला नाहीं, तोपर्यंत त्याची किंमत भरण्यास तो बांधलेला आहे. परंतु हा करार रद्द करण्यांत त्यानें वेळ घालवतां कामा नये. तो रद्द करण्याचा हक्क देणारी बाब त्याचे निदर्शनास आल्यावर योग्य वेळांत त्यानें तो रद्द केला पाहिजे. त्याचें कारण असें कीं, कंपनीच्या घेणेकऱ्याला शेअरहोल्डरांच्या याद्यांवरून कंपनीशीं कितपत व्यवहार करावा, हें ठरविण्याचें असतें. कोणावर व किती विश्वास टाकावा हें तो ठरवितो. तेव्हां एकाद्या भागीदाराकडून शेअर खरेदीचा

करार चुकीच्या आधारावर करविण्यांत आला असेल तर तें माहीत असूनहि तिऱ्हाइतांना शेअर रजिस्टरच्या आधारावर कंपनीशीं व्यवहार त्यानें करूं देणें इष्ट होणार नाहीं. जेव्हां एखादी कंपनी नादार बनून पैसे देण्यास असमर्थ होते, तेव्हां भागीदाराचा शेअर्स घेण्याचा मूळ करार रद्द करण्याचा त्याचा अधिकारही संपुष्टांत येतो. कंपनी चालू आहे तोंपर्यंतच त्याला आपले शेअर्स नाकारतां येतात. प्रस्तुत प्रकरणांत १९३४ सालीं प्रतिवादींना शेअर्स अॅलॉट करण्यांत आले आणि त्यांनीं आपलीं नांवें शेअर होल्डरांच्या रजिस्टरमध्यें राहूं दिलीं. करार रद्द करण्याचा त्यांनीं मुळींच प्रयत्न केला नाहीं. कंपनीची मालमत्ता प्रथमपासूनच असमाधानकारक होती. साखरेचा धंदा तेजींत होता तरी ह्या कंपनीस पांच वर्षें धंदा सुरू करतां आला नाहीं. डायरेक्टर्स व मॅनेजिंग डायरेक्टर्स हे कार्यक्षम नव्हते. त्यांनीं अनेक नियम मोडले, मॅनेजिंग डायरेक्टर्स कित्येक वेळां बदलावे लागले आणि शेवटीं मॅनेजिंग डायरेक्टर होण्यास कोणीच कबूल होईना आणि अगोदरच नालायक ठरलेल्या एकावर ती जागा लादावी लागली. डिव्हिडंड केव्हांच दिलें गेलें नाहीं आणि आर्टिकल्सप्रमाणें जनरल व स्टॅच्युटरी सभा झाल्या नाहींत. ह्या गोष्टी शेअर होल्डरांच्या नजरेस आल्या नसतील असें म्हणतां येणार नाहीं. १९२६ व १९२७ मध्यें कॉल केले, तेव्हां ते नाकारण्यांत आले नाहींत. स्वतःच्या ह्या कृत्यांमुळें, शेअर्स घेण्याचा करार रद्द करण्याचा अधिकार शेअर होल्डर्स गमावून बसले आहेत वाइंडिंग अपचा अर्ज कोर्टाकडे गेल्यानंतर शेअर होल्डरांची शेअरमधून मुक्तता होऊं शकत नाहीं. अर्थात, त्यापूर्वी त्यानें त्याबाबतं तजवीज अगोदर सुरू केली असेल, तर मात्र वाइंडिंग अपचा हुकूम त्याच्या आड येणार नाहीं. शेअर होल्डर्सनीं आपल्या शेअर्सच्या प्रमाणांत कंपनीचीं कर्जें भागविण्यासाठीं रकम दिलीच पाहिजे; घेणेकऱ्यांना त्यांना तसें करण्यास लावण्याचा हक्कच आहे. शेअर होल्डरांना पैसे देण्यास लावण्याचा वाइंडिंग अप हा केवळ एक प्रकार आहे.

शेअर्सच्या खरेदीचा करार रद्द करण्याच्या मागणीबरोबर, कायदेशीर करारच झालेला नव्हता, असें प्रतिवादींचें म्हणणें आहे. ज्यांनीं अलॉटमेंटचा ठराव केला, ते डायरेक्टर म्हणून काम करण्यास लायकच नव्हते, त्यामुळें शेअर खरेदीचा करार अस्तित्वांतच आला नाहीं, असें प्रतिवादींचें म्हणणें. १९३४ सालीं फक्त तीनच लोक डायरेक्टर म्हणून काम करण्यास लायक होते; परंतु सभेचा कोरम चारांचा होता. अॅलॉटमेंटचे व कॉलचे पैसे आपण भरलेले नाहींत, हें डायरेक्टरांना माहीत होतें. त्यामुळें मात्र आपण डायरेक्टर पदाला अपात्र आहेत ही गोष्ट शेअर्स अॅलॉट करतांना व कॉल करतांना त्यांच्या मनांत होती असें दाखविण्याजोगें कांहीं आढळत नाहीं. अॅलॉटमेंटचा व कॉलचा ठराव करतांना त्यांची वर्तणूक लबाडीची नव्हती. आपल्या स्वतःची लायकी नष्ट झाल्यांची त्यांना जाणीव नव्हती एवढेंच. त्याच कारणासाठीं शेअर्स रद्द (फॉरफीट) केले तेहि कायदेशीर झाले असेंच म्हणावें लागेल. शेअर्स फॉरफीट झाले, ह्याचा अर्थ शेअर होल्डर्सनीं शेअर्स गमावले; परंतु त्याबाबतचें त्यांचें देणें मात्र राहिलें.


वरील सर्व कारणांसाठीं हायकोर्टानें खालच्या कोर्टाचा हुकूम बाजूस सारला आणि अर्जदार कंपनीच्या बाजूनें निवाडा केला.

---

बेडेकर पापड

Dr. Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER

मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं. लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन नं.-२२७३८

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रू. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रू. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रू. | १,५१,००० |
| ठेवी | रू. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रू. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## भारतानें भांडवल कसें जमवावें ?

आशिआ आणि अतिपूर्व आर्थिक कमिशनचे प्रमुख डॉ. नॉर्मन गोल्ड ह्यांनीं मद्रास येथें नुकतेंच एक महत्त्वाचें भाषण केलें. अतिपूर्वेकडील देशांचें झपाट्यानें औद्योगीकरण करून लोकांचें राहाणीचें मान उंचावलें पाहिजे असें सांगून डॉ. नॉर्मन गोल्ड पुढें म्हणाले कीं, ह्या कार्यासाठीं लागणारें भांडवल लोकांनींच स्वेच्छेनें शिल्लक टाकून जमविलें पाहिजे. ह्या सर्व देशांतून राष्ट्रीय भावनेची जोरानें वाढ झाली असून राजकारण आणि अर्थकारण एकमेकांत गुंतून गेलीं आहेत, नव्हे त्यांच्यांत एक प्रकारची स्पर्धाच चाललेली आहे. ह्या विरोधांतून मार्ग काढावयाचा असेल तर उत्पादन वाढविणें आणि राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ करणें एवढाच उपाय आहे.

उत्पादन वाढविण्यासाठी उत्पादनांत वापरण्यांत येणारीं हत्यारें आणि यंत्रें ह्यांची कार्यक्षमता वाढविणें जरूर आहे. कोणत्याही धंद्यांत भांडवल गुंतविणें हा केवळ अर्थशास्त्रीय प्रश्न आहे; त्यांत राजकारणाचा कांहीं संबंध नाहीं. भारताला आंतरराष्ट्रीय बँकेकडून कांहीं योजनांसाठी मदत मिळत आहे, पडीक जमीन लागवडीला आणण्यासाठी कांहीं ट्रॅक्टर्सही मिळाले आहेत; परंतु नुसत्या यांत्रिक नांगरणीनें शेतीचें उत्पादन वाढणार नाहीं. त्यासाठीं लागवड करण्याची पद्धत बदलून शेत जमिनींत येणारें पीक वाढविण्याचे प्रयत्नहि झाले पाहिजेत. भारतांतील राहाणीचें मान अत्यंत कमी असल्यामुळें औद्योगीकरणासाठीं लागणारें भांडवल कसें उभारावें हाच खरा प्रश्न आहे. प्रत्येक माणसानें आपल्याला शक्य होईल तितकी बचत करून भांडवल उभारणीला मदत करणें हा एक महत्त्वाचा भाग आहे. त्या दृष्टीनें विचार करतां नॅशनल सेव्हिंग्जची योजना स्वेच्छेनें भांडवल उभारण्याची योजना आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. दुसरा मार्ग म्हणजे सरकारनें कर बसवून भांडवलाची उभारणी करणें. भारताची अर्थव्यवस्था संमिश्र स्वरूपाची असल्यानें रशिआ अगर चीन ह्या देशांप्रमाणें सक्तीची भांडवल उभारणी भारताला करतां येणार नाहीं. रेल्वेचे दर वाढवून सरकारचें उत्पन्न वाढविण्याचा तिसराही एक मार्ग आहे. भारतांतील रेल्वेवरील प्रवासाचे दर फक्त ३० टक्क्यांनींच वाढले आहेत. हें लक्षांत घेतां हा तिसरा मार्ग विचार करण्यासारखा आहे. त्याच बरोबर खाजगी भांडवलालाहि पुरेसा वाव देण्यांत यावा; निरनिराळ्या धंद्यांत ह्या धोरणानें भांडवल गुंतू लागेल आणि उत्पादन वाढून लोकांचें राहाणीचें मान वाढण्यास सुरवात होईल. एकदा प्रारंभ झाला म्हणजे औद्योगीकरणाचा वेग वाढूं लागेल. रेल्वेचे दर वाढविले तर प्रवाशांच्या संख्येंत घट होण्याचा संभव असला तरी रेल्वेचें उत्पन्न एकंदरीनें वाढेल.

डॉ. गोल्ड ह्यांच्या भाषणानंतर अध्यक्ष श्री. अल्लादि कृष्णस्वामी अय्यर ह्यांनीं समारोपाचें भाषण केलें ते म्हणाले कीं, भारतांत चरितार्थाचा मुख्य धंदा शेती हा आहे. म्हणून शेतीचें उत्पादन कसें वाढवितां येईल ह्या प्रश्नाकडे प्रथम लक्ष दिलें गेलें पाहिजे. यंत्रचलित नांगरानें शेती करावयाची झाल्यास सहकारी शेती केल्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. पण भारतांतील शेतकरी नव्या लागवडीच्या पद्धती स्वीकारण्यास फारसे अनुकूल नाहींत. तेव्हां सहकारी शेती अगर उद्योगधंदे ह्यांचा प्रसार होण्यापूर्वीं त्यासंबंधीं विचार आणि प्रचार करणें अगत्याचें आहे. सहकारासंबंधीं वैचारिक पार्श्वभूमि तयार झाल्याशिवाय सहकारी योजना यशस्वी होणें कठीण आहे.

### बंधारे बांधण्यासाठीं आर्थिक मदत

मुंबई सरकारनें शेतकऱ्यांना कच्चे बंधारे बांधण्यासाठीं आर्थिक मदत देण्याबाबतची एकच योजना सर्व राज्यास सरसकट लागू केली आहे. आतांपर्यंत याबाबत कोंकणांतील चार जिल्ह्यांसाठीं एक आणि उरलेल्या जिल्ह्यांसाठीं एक अशा दोन योजना चालू होत्या.

सदरहू योजनेनुसार नव्या जागीं कच्चा बंधारा बांधल्यामुळें पाणीपुरवठ्यासाठीं येणाऱ्या प्रत्येक जादा एकर जमिनीस सहा रु. याप्रमाणें शेतकऱ्यांस आर्थिक मदत देण्यांत येईल. मात्र ती शेतकऱ्यांनीं नव्या जागीं म्हणजे जेथें यापूर्वीं सरकारकडून आर्थिक मदत घेऊन बांधलेल्या बंधाऱ्यांखेरीज इतर मार्गांनीं बांधलेला कच्चा बंधारा नसेल अशाच ठिकाणीं बांधला पाहिजे. तसेंच ज्या जमिनीस सरकारकडून आर्थिक मदत घेऊन बांधलेल्या बंधाऱ्याखेरीज इतर मार्गांनीं पाणीपुरवठा होत नसेल अशा जमिनीस या नव्या बंधाऱ्यांमुळें पाणीपुरवठा झाला पाहिजे.

सामान्यत: जेथें कच्चा बंधारा बांधणें स्वस्तांत पडतें अशा ठिकाणीं शेतकरी स्वयंस्फूर्तीनें बंधारे बांधतात, पण शेतकऱ्यांनीं कमी खर्चाच्या दृष्टीनें न बांधतां ते उपयुक्ततेच्या दृष्टीनें बांधावेत म्हणून सरकार अशा बंधाऱ्यांस आर्थिक मदत देत असतें.

### दि कोल्हापूर मराठा को. बँक लि.

वरील बँकेचें शेअर भांडवल ७,०४६ रु. नीं वाढून तें ८१,८५० रु. झालें आहे. रिझर्व्ह फंड ३४,५७४ रु. असून इतर फंड २७,२११ रु. चे आहेत. सर्व प्रकारच्या ठेवींत वाढ होऊन खेळतें भांडवल ४,३०,००० रु. वरून ५,४९,७९१ रुपयांवर गेलें आहे. चालू दिलेल्या नवीन कोणत्याहि कर्जापैकीं कांहीं थकबाकी नाहीं. शेतकरी सभासद बांधवांच्या अडचणी लक्षांत घेऊन त्यांना अहवालाचे वर्षीं शेतीकरतां ५४,५२० रु. चें नवीन कर्ज देण्यांत आलें. व्यापारी व कारखानदार सभासद-बांधवांना कॅश क्रेडिट्स्, हुंड्या, मालतारण व ओव्हरड्राफ्ट वगैरेंचा १ लाख रु. चेवर पुरवठा करण्यांत आला. अहवालाचे वर्षीं निव्वळ नफा १२,४३१ रु. चा झाला. ६½% डिव्हिडंडला ४,७७८ रु. लागले. (चेअरमन: मा. सा. पाटील. व्हा. चेअरमन: जे. डी. भोसले. ऑ. सेक्रेटरी: डी. डी. ब्रह्मपुरे.)

**राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर नफा**—इंग्लंडच्या मजूर सरकारनें तीन वर्षांपूर्वी कोळशाच्या खाणीच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण केलें. नॅशनल कोल बोर्डानें केलेल्या अंदाजाप्रमाणें १९५० च्या पहिल्या तिमाहींत १,००,००,००० पौंड उत्पन्न होईल. १९४९ च्या पहिल्या तिमाहींतील उत्पन्नापेक्षां हा आंकडा ६०,००,००० पौंडानें अधिक आहे. हा आकडा नक्त नफ्याचा नाहीं. त्यापैकीं ५,०,००,००० पौंड नफ्यावरील कर म्हणून सरकारला द्यावे लागतील. नफ्यावरील कर हा सरकारी व खाजगी दोन्ही प्रकारच्या धंद्यांना द्यावा लागतो.

**शेतीच्या विकासाच्या योजना**—भारत-सरकारनें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेचा एक भाग म्हणून देशाच्या ४ निरनिराळ्या भागांत विशिष्ट अन्नधान्यें पिकविण्याच्या योजनांना उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. माळव्यामध्यें गव्हाच्या पिकावर भर देण्यांत येईल, म्हैसूर-त्रावणकोर-कोचीन ह्या भागांत तांदुळावर जोर देण्यांत येईल आणि मुंबई राज्यांत बाजरी व ज्वारी ह्या पिकांकडे अधिक लक्ष देण्यांत येईल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.